सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०९/२०१८-२०१९

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------

सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक १२/०२/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

31.1.2019

महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.१९/१२/२०१८ रोजीच्या व विशेष सभा दि.०४/०१/२०१९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
   अ) दु:खवट्याचे ठराव.
   ब) अभिनंदनाचे ठराव.

३. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.१३४/२/२ जुना समडोळी रोड,सांगलीवाडी परिसरात कै.राहूल पाटीलनगर असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०१९ चे विषयपत्र.**

५. शिवराज्याभिषेक वर्ल्ड रेकॉर्ड रांगोळी समिती, सांगली यांनी महानगरपालिकेचे सांगली येथील छत्रपती शिवाजी स्टेडियम दि.१०/०२/२०१९ ते दि.२५/०२/२०१९ अखेर १५ दिवस या कालावधीकरीता विनामुल्य मिळणेची मागणी केली आहे. त्यास मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिली असून, सदरचे स्टेडियम भाड्याने देणे अगर कसे याबाबत धोरणात्मक निर्णयासाठी **उपायुक्त (सहा.आयुक्त,प्र.स.क्र.०२) चे विषयपत्र.**

६. महानगरपालिका आमराई उद्यानातील कवठ व चिंच झाडांची फळे, आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यतच्या चिंच झाडांची फळे व रि.स.नं.९९/१ सांगली, व सांगली जुने वॉटर वर्क्सचे आवारातील दोन चिंच झाडांची फळे यांचा जिहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.०३/०१/२०१९ चे विषयपत्र.**

... २ ...

७. महानगरपालिका मिरज शहरातील रस्त्याकडेला असणाऱ्या चिंच फळांचा जाहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास मान्यता देणेबाबत **उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१९/१२/२०१९ चे विषयपत्र.**

८. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये माहे मार्च २०१९ पर्यंत मालमत्ता कराची रक्कम एक रक्कमी भरणाऱ्या महापालिका क्षेत्रातील नागरीकांना मालमत्ता कराच्या शास्तीमध्ये ५०% सवलत देणेबाबत निर्णयार्थ आलेले **अतिरिक्त आयुक्त (कर निर्धारण व संकलन विभाग) यांचे दि.२१/०१/२०१९ चे विषयपत्र.**

९. महानगरपालिका हद्दीतील सरस्वतीनगर,विश्रामबाग,सांगली येथील तेजस मारुती हाळळे वय वर्षे ५ या मुलाचा डॉगबाईट मुळे दि.२२/१२/२०१३ रोजी मृत्यु झालेने त्यास रु.२० लाख देणेबाबत मा.उच्च न्यायालयाचे आदेश आले आहेत. त्यानुसार तात्काळ र.रु.५०,०००/- व दि.०८/०७/२०१५ पासून आजअखेर ८% या दराने व्याजासहीत (र.रु.१३,४४३/-) एकूण र.रु.६३,४६३/- पैकी महापालिकेचा हिस्सा र.रु.३१,७२१/- मा.उच्च न्यायालयात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८८ (ह) (२)(३) अन्वये महापालिका निधीचा वापर करुन जमा करणेस निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१८/०१/२०१९ चे विषयपत्र.**

१०. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

११. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौरसो यांचे मान्यतेने वितरीत

21.1.2019

महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०९/२०१८-२०१९

महापालिका सभा दिनांक १२/०२/२०१९ करीता.

मंगळवार दि.१२/०२/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय, सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.राजेंद्र लक्ष्मण कुंभार, सौ.गितांजली सुर्यवंशी, मा.दिग्विजय सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग दत्तनगर, ८० फुटी रोड चौकास जगतज्योती महात्मा बसवण्णा चौक असे नामकरण करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

२. मा.जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली कर्मवीर भाऊराव पाटील चौक, जिल्हा मध्यवर्ती बँक समोरील उद्यानामध्ये सामाजिक कार्यकर्त्यांनी अर्धपुतळा उभा केलेला आहे. त्याच जागेवर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेत यावा यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जागा हस्तांतरण करणेत यावी व त्याकरीता आवश्यक ती तरतुद करणेस मान्यता देणेसाठी आलेला प्रस्ताव.

३. मा.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वाहतुक नियंत्रण व वाढती गुन्हेगारी यांचेवर नियंत्रण ठेवणेसाठी व पूर्ण क्षमतेने कायदा व सुव्यवस्था अंमलात आणणेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणे तितकेच गरजेचे आहे. यासाठी मा.जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी महानगरपालिका क्षेत्रामध्ये सी.सी.टी.व्ही.यंत्रणा कार्यान्वित करणेकामी र.रु.१ कोटी इतका निधी प्राप्त होवून मिळणेची मागणी केलेली आहे.त्याप्रमाणे मा.जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मागणीनुसार सदर कामी महानगरपालिकेकडून र.रु.१ कोटी पैकी पहिल्या टप्प्यामध्ये रु.५० लाख व दुसऱ्या टप्प्यामध्ये रु.५० लाख याप्रमाणे निधी वर्ग करणेस धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

४. मा.धिरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव :-

महाराष्ट्र शासनाने दि.३० जानेवारी २०१९ रोजी अधिसूचनेद्वारे राज्यातील सर्व शासकीय व सार्वजनिक स्थानिक अनुदानीत संस्था यांना सातव्या वेतन आयोगानुसार दि.०१ जानेवारी २०१६ पासून मंजूर करुन दिनांक ०१ फेब्रुवारी २०१९ पासून प्रत्यक्ष अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी यांना दि.०१ जानेवारी २०१९ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चितद्वारे निवृत्ती वेतन आदा करणेबाबतचे निर्देश आहेत.

महापालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ मंजूर पदसंख्या २३७७ असून, सद्या कार्यरत पदसंख्या फक्त १६२३ इतकी आहे. त्यापैकी १२०० पदे ही वर्ग -४ ची असल्यामुळे सातव्या वेतन आयोगापोटी नाममात्र बोजा वाढणार आहे.

तरी शासन निर्णयाप्रमाणे महापालिका आस्थापनावरील वर्ग १ ते ४ च्या कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे (कार्यरत व सेवानिवृत्त) राज्य शासनाच्या धर्तीवर मंजूर करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

५. मा.योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील कोल्हापूर चाळ रेल्वे लाईन जवळील गेली अनेक वर्षे मदारी लोक झोपड्या घालून राहतात. रेल्वे प्रशासनाने मंडल इंजिनियर यांनी झोपडपट्टी धारकांचे अतिक्रमण काढणेबाबत मदारी लोकांना नोटीस दिली आहे. सदरचे लोक हे वर्षानुवर्षे त्या झोपडपट्टीत असून, सद्या त्यांचेकडे उपलब्ध असलेले पुरावे घेवून मनपा हिस्सा भरुन घेवून, भारतामध्ये कोठेही घर नसलेचे स्वयंघोषणापत्र घेवून, त्यांना मिरज म्हैशाळ रोडवरील वाल्मिकी आवास योजनेमधील एकूण ३८ घरकुले देणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

... २ ...

६. मा.विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका प्रभाग समिती क्र.०८ मधील खारे मळा कुपवाड येथे सुमारे १ कोटी रुपये खर्च करुन गटर बांधणेत आलेली आहेत. परंतु सदर गटारीतील पाण्याचा निचरा नैसर्गिकरित्या नैसर्गिक नाल्या पर्यत होत नसल्यामुळे तेथील १०० ते १५० कुटूंबाच्या घरात व रस्त्यावर पाणी तुंबून राहत असलेमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो त्यामुळे महापालिकेची यंत्रणा विनाकारण अडकून पडत आहे. त्यामुळे याबाबत कायमस्वरुपी तोडगा काढणे आवश्यक आहे. परंतु, गटर व नैसर्गिक नाल्यामध्ये अंदाजे २०० मीटर जागा ही महापालिकेच्या मालकीची नसलेने सदर गटारीचे सांडपाणी नैसर्गिकरित्या नैसर्गिक नाल्यात सोडण्यास तांत्रिक अडचणी येत आहेत. जागा मालकाने सदर जागेची नुकसान भरपाई दिलेशिवाय गटर नाल्यास जोडणेस प्रतिबंध केला असून, याबाबत न्यायालयाकडून स्थगितीही घेतलेली आहे. सदर सांडपाणी नैसर्गिक नाल्यापर्यत पोहचविणेसाठी मनपाच्या मालकीची नसलेली अंदाजे २०० मीटर जागेचे भूमी संपादन करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

७. मा.मनगू आबा सरगर यांनी दिलेला प्रस्ताव :-

महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०९ मधील अहिल्यादेवी हौसिंग सोसायटी,समता हौसिंग सोसायटी, दत्त कॉलनी या भागातील स.क्र.५६७२/ब/१३ या महापालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेत समाज मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या सभागृहास या भागातील सामाजिक कार्यकर्ते कै.भूपाल महादेव माळी (गोडसे) यांचे नाव देणेस तसेच सदरचे सभागृह या भागातील नागरिकांना त्यांच्या कार्यक्रमास नाममात्र दराने मा.मालमत्ता व्यवस्थापक यांचेकडे प्रति चार तासाकरीता रु.१०००/- या दराने उपलब्ध करुन देणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

८. मा.अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज येथील कर्नाटकातून येणाऱ्या राज्य महामार्ग व सांगली व पंढरपूर कडे जाण्यासाठी अस्तित्वात असणाऱ्या रस्त्यालगत भव्य मोठा चौक आहे. सदरच्या चौकामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आणि त्यांच्या नावे मिरजेतील एकमेव चांगल्या स्थितीतील उद्यान आहे. त्या चौकास संविधान चौक असे नामकरण करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

९. मा.आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेचा घनकचरा प्रकल्प हा महानगरपालिकेच्या व नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रकल्प असल्याने घनकचरा व्यवस्थापनाबाबतचे महत्वाचे व पर्यावरणपुरक निर्णय होवून सदरचा प्रकल्प तातडीने मार्गी लावणेसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व्यवस्थितपणे राबविणेसाठी आठ सदस्यीय समिती गठीत करुन त्यातील एका सदस्यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : ०८/०२/२०१९.

महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १०४

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण सभा दि.१९/१२/२०१८ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.७७ ते ठराव क्र.१०२ आणि विशेष सभा दि.०४/०१/२०१९ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१०३ हे सभागृहात वाचून दाखविणेत आले. सदरचे कार्यवृत वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- ९२१

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०५/०१/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली सि.स.नं.१३४/२/२ जुना समडोळी रोड,सांगलीवाडी परिसरात कै.राहूल पाटीलनगर असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त विषयाच्या अनुषंगाने सौ.वहिदा अय्याज नायकवडी यांनी दिलेली उपसूचना सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील मिरज गेस्ट हाऊस, इदगाहनगर ते एस.टी.वर्कशॉप ते हनुमान मंदिर या १०० फुटी रस्त्यास स्वर्गीय खासदार हिंदरत्न प्रकाशबापू पाटील असे नामकरण करणेकामी स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन हरकती व सूचना मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.मिरज सुधवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.युवराज गावडेकर

महापौर,

मालमत्ता अवलोकन

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- ३२२

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (सहा.आयुक्त,प्र.स.क्र.०२) चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

शिवराज्याभिषेक वर्ल्ड रेकॉर्ड रांगोळी समिती, सांगली यांनी महानगरपालिकेचे सांगली येथील छत्रपती शिवाजी स्टेडियम दि.१०/०२/२०१९ ते दि.२५/०२/२०१९ अखेर १५ दिवस या कालावधीकरीता विनामुल्य मिळणेची मागणी केली आहे. त्यास मा.आयुक्तसो यांनी मान्यता दिली असून, सदरचे स्टेडियम भाड्याने देणे अगर कसे याबाबत धोरणात्मक निर्णयासाठी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. प्रस्तुत विषयी सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा या प्रसंगाचे वर्ल्ड रेकॉर्ड रांगोळी रेखाटनासाठी शिवराज्याभिषेक वर्ल्ड रेकॉर्ड रांगोळी समिती, सांगली यांचे मार्फत सांगली जिल्हातील ५० रंगावलीकार व १०० सहा.कलाकार मिळून सव्वालाख स्क्वेअर फुट इतकी भव्य रांगोळी रेखाटनार आहेत. त्याकरीता दि.१०/०२/२०१९ ते २५/०२/२०१९ अखेर १५ दिवस या कालावधीकरीता सांगली येथील छत्रपती शिवाजी स्टेडियम हे विनामुल्य उपलब्ध करुन देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.तहसभा नवलाई. ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.युवराज बावडेकर महापौर,

सहा. आयुक्त प्र.स.क्र.2

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९
ठराव क्रमांक :- १२३
विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.०३/०१/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका आमराई उद्यानातील कवठ व चिंच झाडांची फळे, आमराई ते कॉलेज कॉर्नर पर्यंतच्या चिंच झाडांची फळे व रि.स.नं.९९/१ सांगली, व सांगली जुने वॉटर वर्क्सचे आवारातील दोन चिंच झाडांची फळे यांचा जिहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

सूचक :- मा. हिरन सुर्यवंशी ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज कांबळेकर. महापौर,

शहर अभि. (उद्याने)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १२४

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (उद्याने विभाग) यांचे दि.१९/१२/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका मिरज शहरातील रस्त्याकडेला असणाऱ्या खालील ११ ठिकाणच्या एकूण १९० झाडांच्या चिंच फळांचा जाहिर लिलाव करणेस व लिलाव प्रक्रिया मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने पूर्ण करणेस व त्याकामी येणारे प्रसिद्धीचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

अ.क्र.	रस्त्याचे नाव	संख्या
१.	मिरज मनपा कार्यालयाजवळ	१
२.	दक्षिण-उत्तर किल्ला रस्ता	९
३.	लक्ष्मी मार्केट ते रेल्वे स्टेशन	१३
४.	मिरज हायस्कूल ते शास्त्री चौक	४
५.	जुना आगार परिसर	९
६.	टिंबर एरिया ते म्हैशाळ नाका	३८
७.	टाऊन हॉल	१
८.	दवाखाना परिसर	५
९.	मिरज हायस्कूल	६
१०.	चक्कर सडक	१००
११.	लोणी बाजार	४
	एकूण झाडे संख्या	१९०

सूचक :- मा. मीरज दुर्वेकरी- ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.युवराज कांबळेकर

महापौर,

शहर अभियंता (उद्याने)

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १२५

विषय क्रमांक :- ०८

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (कर निर्धारण व संकलन विभाग) यांचे दि.२१/०१/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.महासभा ठराव क्र.४७ दि.२८/०८/२०१७ अन्वये दि.३१ मार्च २०१७ पर्यत एक रक्कमी मालमत्ता कराची रक्कम भरणाऱ्या नागरिकांना शास्ती मध्ये ५०% सवलत देणेस मान्यता देणेत आली असलेने, कर वसुलीच्या प्रमाणात वाढ झालेली होती. कर वसुली मध्ये झालेली वाढ विचारात घेता, दि.३१ मार्च २०१९ पर्यत शास्तीमध्ये ५०% सवलत दिल्यास, कर वसुलीचे उद्दीष्ठ पूर्ण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये मा.आयुक्तसो यांचे दि.१८/०१/२०१९ रोजीचे झाले मान्यतेच्या दिनांकापासून दि.३१ मार्च २०१९ पर्यत मालमत्ता कराची एक रक्कमी रक्कम भरणाऱ्या महापालिका क्षेत्रातील नागरीकांना मालमत्ता कराच्या शास्तीमध्ये ५०% सवलत देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. धीरज सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

कर निर्धारण व संकलन

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १२६

विषय क्रमांक :- ०९

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.१८/०१/२०१९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका हद्दीतील सरस्वतीनगर,विश्रामबाग,सांगली येथील तेजस मारुती हाळ्ळे वय वर्षे ५ या मुलाचा डॉगबाईट मुळे दि.२२/१२/२०१३ रोजी मृत्यु झालेने त्यास रु.२० लाख देणेबाबत मा.उच्च न्यायालयाचे आदेश आले आहेत. त्यानुसार तात्काळ र.रु.५०,०००/- व दि.०८/०७/२०१५ पासून आजअखेर ८% या दराने व्याजासहीत (र.रु.१३,४४३/-) एकूण र.रु.६३,४६३/- पैकी महापालिकेचा हिस्सा र.रु.३१,७२१/- मा.उच्च न्यायालयात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ८८ (ह) (२)(३) अन्वये महापालिका निधीचा वापर करुन जमा करणेस निर्णयार्थ आलेले व दरम्यानचे कालावधीत दि.०२/०२/२०१९ अन्वये प्राप्त झालेले सुधारीत विषयपत्र या सभेने अवलोकनी घेवून हीसभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

उपरोक्त प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार मा.आयुक्तसो यांचे मंजूरीने र.रु.६३,४४२/- चा धनादेश मा.उच्च न्यायालयात जमा करणेत आलेला आहे. त्यास ही सभा कार्योत्तर मान्यता देत आहे.

सूचक :- मा. धीरज सुर्यवंशी ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Y. S. Bamuna
मा. युवराज बावडेकर.

महापौर,

वैद्य. आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- ३२७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य राजेंद्र लक्ष्मण कुंभार, सौ.गितांजली सुर्यवंशी, मा.दिग्विजय सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील विश्रामबाग दत्तनगर, ८० फुटी रोड चौकास जगतज्योती महात्मा बसवण्णा चौक असे नामकरण करणेबाबत निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- मा. मिरज सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.युवराज आवडेकर.

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

माननीय उपसूचक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १२८

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य जगन्नाथ बापू ठोकळे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगली कर्मवीर भाऊराव पाटील चौक, जिल्हा मध्यवर्ती बँक समोरील उद्यानामध्ये सामाजिक कार्यकर्त्यांनी अर्धपुतळा उभा केलेला आहे. त्याच जागेवर लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा उभा करणेत यावा यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जागा हस्तांतरण करणेत यावी व त्याकरीता आवश्यक ती तरतुद करणेस मान्यता देणेसाठी आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. धीरज सुर्यवंशी ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. युवराज बावडेकर

महापौर,

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १२९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य धीरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये वाहतुक नियंत्रण व वाढती गुन्हेगारी यांचेवर नियंत्रण ठेवणेसाठी व पूर्ण क्षमतेने कायदा व सुव्यवस्था अंमलात आणणेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होणे तितकेच गरजेचे आहे. यासाठी मा.जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी महानगरपालिका क्षेत्रामध्ये सी.सी.टी.व्ही.यंत्रणा कार्यान्वित करणेकामी र.रु.१ कोटी इतका निधी प्राप्त होवून मिळणेची मागणी केलेली आहे.त्याप्रमाणे मा.जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मागणीनुसार सदर कामी महानगरपालिकेकडून र.रु.१ कोटी पैकी पहिल्या टप्प्यामध्ये रु.५० लाख व दुसऱ्या टप्प्यामध्ये रु.५० लाख याप्रमाणे निधी वर्ग करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा.धीरज सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.युवराज गावडेकर.

महापौर,

शहर अभियंता (विद्युत)

उपमहापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १३०

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य धीरज चंद्रकांत सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.३० जानेवारी २०१९ रोजी अधिसूचनेद्वारे राज्यातील सर्व शासकीय व सार्वजनिक स्थानिक अनुदानीत संस्था यांना सातव्या वेतन आयोगानुसार दि.०१ जानेवारी २०१६ पासून मंजूर करुन दिनांक ०१ फेब्रुवारी २०१९ पासून प्रत्यक्ष अंमलबजावणी करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. तसेच, सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी यांना दि.०१ जानेवारी २०१९ पासून सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन निश्चितद्वारे निवृत्ती वेतन आदा करणेबाबतचे निर्देश आहेत.

महापालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ मंजूर पदसंख्या २३७७ असून, सद्या कार्यरत पदसंख्या फक्त १६२३ इतकी आहे. त्यापैकी १२०० पदे ही वर्ग -४ ची असल्यामुळे सातव्या वेतन आयोगापोटी नाममात्र बोजा वाढणार आहे.

सद्या मा.शासन आदेशाप्रमाणे महापालिका स्थलसिमेतील सर्व मालमत्तांचे सॅटेलाईट सर्व्हेक्षण करणेत येणार असलेमुळे मालमत्ता करामध्ये भरीव वाढ अपेक्षित आहे. तसेच, महापालिका मालकीच्या मालमत्ता, दुकान गाळे, खुल्या जागा इ.फेर सर्व्हेक्षण करणेत येणार असलेमुळे उत्पन्नात वाढ होणार आहे. सद्या महानगरपालिकेचा आस्थापना खर्च निश्चित करीत असताना त्यामध्ये महानगरपालिकेकडील इंधन खर्च,कार्यालयीन खर्च व इतर बांधील खर्चांचा समावेश करुन, आस्थापना खर्च निश्चित करणेत येत आहे. त्यामुळे आस्थापना खर्चाची टक्केवारी जास्त दिसून येते. परंतु, प्रत्यक्षात आस्थापना खर्चाच्या टक्केवारी मध्ये ज्या प्रमुख बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे. त्या करुन टक्केवारी काढलेस प्रत्यक्षात आस्थापना खर्चाची टक्केवारी ३५% पर्यतच होत असलेचे दिसून येते. या सर्व बाबींचा विचार करता, महापालिका कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन लागू करणेस ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महाराष्ट्र शासन अधिसूचना, वित्त विभाग क्र.वेपुर/२०१९/प्र.क्र.१/सेवा-९ दि.३० जानेवारी २०१९ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ अन्वये ज्या पात्र कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन लागू करणेस मान्यता देणेत आलेली आहे त्याच धर्तीवर महानगरपालिका आस्थापनेवरील वर्ग १ ते ४ चे कार्यरत व सेवानिवृत्त पात्र कर्मचाऱ्यांना सुधारीत वेतन लागू करणेस ही सभा सर्वानुमते मान्यता देत आहे. सुधारीत वेतन दि.०१ जानेवारी २०१६ पासून वेतन निश्चिती करुन प्रत्यक्षात शासन मान्यतेच्या दिनांकापासून वेतन अदा करणेत यावे. मागील कोणताही फरक देणेत येवू नये याबाबत संबंधीत कर्मचाऱ्यांकडून लेखी बंधपत्र करुन घेणेची जबाबदारी प्रशासनाची राहील. तसेच, उपरोक्त शासन अधिसूचनेस अनुसरुन वेळोवेळी पारीत होणारे नियम, आदेश महापालिका कर्मचाऱ्यांना लागू करणेस ही सभा सर्वानुमते मान्यता देत असून, त्यासाठी आवश्यकतो प्रस्ताव शासन मान्यतेस पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- (मा. धीरज सुर्यवंशी) ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Y. S Banerjee (मा. युवराज बावेकर) महापौर,

प्रशासन प्रा.वि. (आस्था.)
प्रस्तुत ठराव मा. आयुक्त यांचे निदर्शनास आणून पुढील कार्यवाही करावी.

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- 931

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य योगेंद्र भगवान थोरात यांनी दिलेला प्रस्ताव व त्या अनुषंगाने प्राप्त झालेले उपायुक्त (शनादानिक) यांचे दि.०८/०२/२०१९ चे विषयपत्र स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रामध्ये झोपडपट्टी धारकांना / बेघरांना राहण्यासाठी वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेतून सन २००५ -२०१६ सालामध्ये घरकुले बांधण्यात आली त्यामध्ये मा.जिल्हाधिकारी, सांगली यांचे सूचनेनुसार प्रथम प्राधान्य आरक्षित क्षेत्रावर झोपड्या बांधून राहणारे व रस्त्याच्या दुतर्फा झोपड्या बांधून राहणाऱ्या व्यक्तींना होते. तद्नंतर बेघरांना सदर योजनेचा लाभ देणेचा होता.

महानगरपालिकेकडे बेघरांना राहण्यासाठी वाल्मिकी आंबेडकर आवास योजनेंतर्गत सांगली येथील २१६ सदनिका मा.उच्च न्यायालय,मुंबई यांचेकडील रिटपिटीशन याचिका क्र.३४१२/२०१५ (शंकर पुजारी, सांगली जिल्हा निवारा संघ) मध्ये बेघरांना तात्काळ घरे उपलब्ध करुन दयावेत असे निर्देश दिलेले आहेत. त्याप्रमाणे सदर लाभार्थिना त्यांचे पुरावे तपासून, लाभ देणे उचित होईल.

तसेच, मिरज येथे १२४+ २१६ अशी एकूण ५५६ घरकुले सद्या शिल्लक आहेत. मा.आयुक्तसो यांचे मान्यतेने दैनिक वृत्तपत्रात जाहिर निवेदन प्रसिद्ध केले होते. उपरोक्त प्राधान्यानुसार मिरज येथील मदारी झोपडपट्टीमध्ये राहणारे ४३ झोपडपट्टी वासियांनी लेखी पत्राद्वारे घरकुलाची मागणी केली आहे. परंतु, शासन निकषानुसार सदर झोपडपट्टी धारकांच्याकडे दि.०१/०१/१९९५ चे मतदार ओळखपत्र, मतदार यादीतील नाव व लाईट बिल अथवा घर पावती आढळून येत नाही. परंतु, सन २०११ नंतरचे आधारकार्ड,मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड इ.पुरावे दिसून येत आहेत.

सहाय्यक मंडळ इंजिनिअर मंडल कार्यालय,मिरज यांनी सदर झोपडपट्टीचे अतिक्रमण दि.३१/०१/२०१९ पूर्वी काढून घेणेबाबत मा.उपायुक्तसो यांना कळविले आहे. त्यानुसार सदर झोपडपट्टी धारकांनी महापालिकेकडे अर्ज करुन वाल्मिकी आवास योजनेतील घरकुलांचा लाभ मिळणेची मागणी केलेनुसार महानगरपालिका क्षेत्रातील मिरज येथील कोल्हापूर चाळ रेल्वे लाईन जवळील गेली अनेक वर्षे मदारी लोक झोपड्या घालून राहत असल्यामुळे त्या ठिकाणी असलेल्या प्राप्त ४१ अर्जापैकी पात्र ३४ लाभार्थींना वाल्मिकी आवास योजनेतील घरकुलांचा लाभ देणेसाठी त्यांचेकडून उपलब्ध असलेले पुरावे उदा. आधारकार्ड,मतदार ओळखपत्र, रेशनकार्ड व भारतात कोठेही घर नसलेचे स्वयंघोषणापत्र व महापालिकेचा हिस्सा भरुन घेवून, पात्र ३४ लाभार्थींना मिरज म्हैशाळ रोडवरील वाल्मिकी आवास योजनेतील रिकाम्या उपलब्ध घरकुलांचा लाभ देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. धीरज सुर्यवंशी. ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा. युवराज बावडेकर.

नगर अभियंता (नादानिक)

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १३२

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका प्रभाग समिती क्र.०८ मधील खारे मळा कुपवाड येथे सुमारे १ कोटी रुपये खर्च करुन गटर बांधणेत आलेली आहेत. परंतु सदर गटारीतील पाण्याचा निचरा नैसर्गिकरित्या नैसर्गिक नाल्या पर्यत होत नसल्यामुळे तेथील १०० ते १५० कुटूंबाच्या घरात व रस्त्यावर पाणी तुंबून राहत असलेमुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन कराधा लागतो त्यामुळे महापालिकेची यंत्रणा विनाकारण अडकून पडत आहे. त्यामुळे याबाबत कायमस्वरुपी तोडगा काढणे आवश्यक आहे. परंतु, गटर व नैसर्गिक नाल्यामध्ये अंदाजे २०० मीटर जागा ही महापालिकेच्या मालकीची नसलेने सदर गटारीचे सांडपाणी नैसर्गिकरित्या नैसर्गिक नाल्यात सोडण्यास तांत्रिक अडचणी येत आहेत. जागा मालकाने सदर जागेची नुकसान भरपाई दिलेशिवाय गटर नाल्यास जोडणेस प्रतिबंध केला असून, याबाबत न्यायालयाकडून स्थगितीही घेतलेली आहे. सदर सांडपाणी नैसर्गिक नाल्यापर्यत पोहचविणेसाठी मनपाच्या मालकीची नसलेली अंदाजे २०० मीटर जागेचे भूमी संपादन करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्तावावर सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झालेनुसार मा.शेखर इनामदार यांनी या प्रकरणी येणाऱ्या अडचणीवर पुर्णपणे तोडगा काढणेत आल्याचे विदित केलेनुसार ही सभा सदरचा प्रस्ताव रद्द करीत आहे.

सूचक :- मा.धीरज सुर्वेसंती

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :- मा.युवराज बावडेकर

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १३३

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य मनगू आबा सरगर यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महापालिका क्षेत्रातील प्रभाग क्र.०९ मधील अहिल्यादेवी हौसिंग सोसायटी,समता हौसिंग सोसायटी, दत्त कॉलनी या भागातील स.क्र.५६७२/ब/१३ या महापालिकेच्या मालकीच्या खुल्या जागेत समाज मंदिराचे बांधकाम पूर्ण झाले आहे. या सभागृहास या भागातील सामाजिक कार्यकर्ते कै.भूपाल महादेव माळी (गोडसे) यांचे नाव देणेस तसेच सदरचे सभागृह या भागातील नागरिकांना त्यांच्या कार्यक्रमास नाममात्र दराने मा.मालमत्ता व्यवस्थापक यांचेकडे प्रति चार तासाकरीता रु.१०००/- या दराने उपलब्ध करुन देणेस चर्चा होवून धोरणात्मक निर्णय घेणेसाठी आलेला प्रस्तावावर सभागृहात झाले चर्चेनुसार प्रस्तुत विषयी प्रशासनाने सविस्तर अहवाल सादर करणेत यावा असे ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. धीरज सुर्यवंशी

अनुमोदक :- मा.युवराज बावडेकर

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १३४

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य अतहर इद्रिस नायकवडी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

मिरज येथील कर्नाटकातून येणाऱ्या राज्य महामार्ग व सांगली व पंढरपूर कडे जाण्यासाठी अस्तित्वात असणाऱ्या रस्त्यालगत भव्य मोठा चौक आहे. सदरच्या चौकामध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा आणि त्यांच्या नावे मिरजेतील एकमेव चांगल्या स्थितीतील उद्यान आहे. त्या चौकास संविधान चौक असे नामकरण करणेस मा.महासभेने निश्चित केले धोरणानुसार पुढील योग्यती कार्यवाही ठेवणेस ही सभा आदेशित करीत आहे.

सूचक :- मा. धीरज सुर्यवंशी

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- Y. S Bamane

मा. युवराज बावडेकर

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०९ दिनांक :- १२/०२/२०१९

ठराव क्रमांक :- १३५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य आनंदा मारुती देवमाने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेचा घनकचरा प्रकल्प हा महानगरपालिकेच्या व नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रकल्प असल्याने घनकचरा व्यवस्थापनाबाबतचे महत्वाचे व पर्यावरणपुरक निर्णय होवून सदरचा प्रकल्प तातडीने मार्गी लावणेसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प व्यवस्थितपणे राबविणेसाठी आठ सदस्यीय समिती गठीत करुन त्यातील एका सदस्यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करणेबाबत निर्णय घेणेसाठी सादर करणेत आलेल्या प्रस्तावावर सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार प्रस्तुतचा प्रस्ताव ही सभा प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :- सर आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,